MHGA130001072024

सत्र खटला क्र.१५/२०२४
महा.शासन मार्फत पोलीस स्टेशन,
ताडगाव–वि–मनोज दशरथ गावडे

निशानी ०४ वरील आदेश
(दि.२८/०८/२०२४)

१. अर्जदार/आरोपी मनोज दशरथ गावडे याने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे ताडगाव पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक ०३/२०२३ मध्ये भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. अर्जदार हा राह. चिचोड, ता. भामरागड, जि. गडचिरोली येथील रहिवासी आहे.

२. आरोपीचे असे कथन आहे की, तो चिचोड ता. भामरागड येथील स्थायी रहिवासी आहे. आरोपीस संशयाच्या आधारावर गुंतविण्यात आले आहे. आरोपीजवळून त्यास गुन्ह्यात गुंतविणारा पुरावा मिळुन आला नाही. आरोपीस दारु पिण्याची सवय आहे. आरोपीच्या पत्नीच्या खोटया बयानावरुन त्यास गुन्ह्यात गोवल्या जात आहे. आरोपी पुस्कळ दिवसापासुन कारगृहात आहे. तसचे तो वि.न्यायालयच्या अटी शर्तीचे पालन करण्याची हमी देतो. करीता आरोपीला जामीन मंजूर करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

३. सरकारी वकील श्री.भांडेकर यांनी यांनी अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र. ०४ च्या पाठीमागे दिले की, दि २३.११.२०२३ रोजी मृतक रामा काटीया गावडे आपल्या शेतामध्ये झोपडीत झाले होते. दुस–या दिवशी २४.११.२०२३ रोजी रामा गावडे मृत झाल्याचे आढळले. त्याचे मानेवर कापलेली जखम होती. त्यामुळे तो मरण पावला. तपासणी दरम्यान असे निष्पन्न झाले की आरोपीने रामा काटीया गावडे चा खुन केला. आरोपीकडून एक कु–हाड जप्त करण्यात आली. किशोर गावडे, विजय, सुधाकर आणि अशोक यांच्या बयानावरुन असे दिसून येते की आरोपीने रामा काटीया गावडे चा खुन केला. सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. साक्षदार आणि आरोपी हे गावचे आहेत. त्यामुळे साक्षदारांवर आरोपीव्दारा दबाव आणण्याची शक्यता आहे. करीता सदर आरोपीचा जामीन

अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. गुन्हयाची हकीकत अशी की, दि २३.११.२०२३ रोजी फिर्यादीचे वडील रामु कटीया गावडे हे सायंकाळी शेतातुन घरी आले. दि २४.११.२०२३ रोजी तो व त्याची आई लिंबी , भाउ विजय, मल्लेश आणि त्याची पत्नी वारली हे घरी हजर असतांना सकाळी ६.०० वा दरम्यान त्याचे आई शेतातील असलेलया झोपडीत झाडू मारुन येतो म्हणुन निघुन गेली. अंदाजे ६.३० वा चे दरम्यान ती रडत घरी आली. तिला रडण्याचे कारण विचारले असता तिने सांगितले की, मी शेतातील झोपडीत झाडु मारण्याकरीता गेले असता तिथे तिचे पती रामु हे खाटेवर झोपले होते व खाटेखीली जमिनीवर रक्त सांडलेले दिसले म्हणुन तिने पती रामुला काय झाले म्हणुन हलवून पाहिले परंतू तो काहीही बोलला नाही. त्याची हालचाल नव्हती असे सांगितले. तेव्हा फिर्यादी व त्याची आई व असे मिळुन शेतातील झोपडीत जाउन पाहिले असता तेथे त्याचे वडील रामु हे खाटेवर पुर्ण अंगावर चादर पांगरुन उजव्या कुशीवर झोपलेल्या अवस्थेत दिसले.खाटेखाली रक्ताचे डाग दिसले. त्यानंतर गावात सदर बातमी दिली. त्याचे वडीलाच्या अंगावरील पांघरुन काढून पाहिले असता त्याचे गळयावर डाव्या बाजुला जखमी दिसत होती. त्याने व गावक—यांनी त्यास हलवून पाहिले असता त्याची हालचाल दिसून आली नाही. रामु गावडे यांना कोणतरी अज्ञात इसमाने गळयावर शस्त्राने वार केल्याने त्याचा मृत्यू झालाचे समजले. त्यानंतर तोंडी रिपोर्ट दिली म्हणून पोलीस स्टेशन ताडगाव यांनी अज्ञात आरोपी विरुद गुन्हा क. ०३/२०२३ मध्ये भादंवी कलम ३०२ अन्वये नोंद केला.

५. अर्जदार/आरोपीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, गुन्हा घडतांना कोणीही बघीतलेले नाही. तपासणी अधिका—याने गोळा केलेला पुरावा हा परिस्थीती जन्य स्वरुपाचा आहे. तसा पुरावा हा कमकुवत पुरावा मानला जातो. अर्जदार याचे विरुध्द त्याचे बायकोने कथन केल्याचे दिसून येते. अशा प्रकारे आरोपीला खोट्या गून्ह्यात गोवण्यात आले आहे. गुन्हा करण्याचा कोणतेही कारण नाही. आरोपीला दारु पिण्याची सवय असल्याने त्याच्या बायकोने त्याला खोट्या प्रकरणात गोवलेले असून तो ६ महिन्यापासून गजाआड आहे. प्रकरणात कोणत्याही प्रकारे प्रगती झाली नाही. त्यामुळे अर्जदाराचा जामीन अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

६. याउलट सरकारी वकिल श्री भांडेकर यांनी असा युक्तीवाद मांडला की, गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असून आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली कू–हाड जप्त करण्यात आलेली आहे. आरोपीच्या विरुध्द साक्षदार किशोर, विजय, सुधाकर आणि अशोक यांची बयान पोलिसांनी नोंदविलेले आहे. त्या आधारे आरोपीचा या गुन्हयाशी संबध असल्याचे दिसून येते त्यामुळे  अर्जदाराचा जामीन अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली.

७. पोलिसांनी गुन्हयाचा तपास पुर्ण करुन दि १५.३.२०२४ रोजी दोषारोप पत्र दाखल केले. तपास अधिक–यांनी नि ५ प्रमाणे सी ए रिपोर्ट सादर केले. त्यानंतर सरकारी वकीलांनी नि ६ प्रमाणे दि ६.८.२०२४ रोजी डॉफट् चार्ज दिला आणि त्याच दिवशी आरोपी विरुध्द नि. ७ प्रमाणे दोष नोंदविण्यात आले. अशा प्रकारे गुन्हयामध्ये प्रगती होत असल्याचे दिसून येते.

८. तपासा दरम्यान पोलिसांनी आरोपीचे निवेदन साक्षदारांसमक्ष नोंदविले आणि त्या अनुषंगाने आरोपीने झाडाखाली लपवून ठेवलेले कू–हाड काढून दिली व ती कू–हाड पोलिसांनी जप्त केली त्यावरुन आरोपी याचा गुन्हयाशी संबध आहे असे म्हणता येईल असा जो युक्तीवाद सरकारी वकीलांनी मांडला त्यात तथ्य दिसून येते.

९. साक्षदार किशोर गावडे सुधाकर गावडे, विजय गावडे व पिंकी गावडे यांचे कलम १६४ फो.प्र.सं. प्रमाणे बयान नोंदविण्यात आले. पिंकी गावडे ही आरोपीची पत्नी असून तिने तिचे बयानात असे सांगितले आहे की, तिच्या पतीने तिला त्याच्या काकाचा खुन केल्याचे सांगितले आणि त्यानंतर तिने ही बाब सुधाकर गावडे, विजय गावडे व किशोर गावडे यांना सांगितले. त्यावरुन पिंकी गावडे हिची साक्ष महत्वाची आहे. अशा परिस्थीतीत जर आरोपीला पिंकी गावडेची साक्ष नोंदविण्यापूर्वी जामीन दिली तर तश्या प्रसंगी तो तिच्यावर दबाव आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही किंवा आरोपीला दारु पिण्याची सवय असल्यामुळे त्याच नशेत तो तिचासुध्दा खुन करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे या घडीला आरोपीला जामीन देणे न्यायोचित होणार नाही. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

जामीन अर्ज निशानी ०४ नामंजुर करण्यात येते.

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2024.08.28 17:33:43 +0530

अहेरी (र.ना. बावनकर)
दि. २८.०८.२०२४ अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.